# जगणे, मरणे, पुरणे, उठणे, पुन्हा येणे

आज, आपल्या अंतकरणामध्ये कसा अनुभव करीत आहोत, हे आपण मानवी भाषांमध्ये व्यक्त करणे अगदी शक्ति पलीकडचे आहे, जेव्हा ह्या सर्वात पवित्र, पवित्र सकाळी आपण येथे जमलो आहोत. आजची सकाळ तो समय दर्शवते जेव्हा आपला धर्म खरा ठरला होता, कारण तो तुझ्या मौल्यवान पुत्राचा पुन्हा उदय होता जो संपूर्ण मानवजातीची सुटका करण्यासाठी आला होता. आणि आज सकाळी आपण तो महान, सर्वोच्च विजय साजरा करण्यासाठी येथे आहोत, प्रभु, ज्याने आम्हाला मृत्यू, नरक आणि कबर या दोन्हींवर विजय मिळवण्यापेक्षा अधिक बनविले. आणि आम्ही तुझे आभार मानतो की, इतकी वर्षे उलटून गेल्यानंतर, आम्ही अजूनही या इस्टरच्या दिवशी सकाळी लवकर एकत्र होतो, त्याची आराधना करण्यासाठी, कारण आमचा विश्वास आहे की तो पुन्हा येणार आहे.

2 आणि आमची प्रार्थना आहे की तू आमच्या सर्व पापांची आणि आमच्या अपराधांची क्षमा करशील जे आमच्या विरुद्ध नोंदविले गेले आहेत, कारण आम्ही नम्रपणे आपली चूक कबूल करतो आणि आपल्या पापांसाठी त्याचे प्रायश्चित स्वीकारतो. प्रभु, आमच्यामध्ये असलेले आजार बरे कर. आम्ही तुझे पवित्र वचन वाचत असताना आम्हाला सहाय्य कर, जे सर्व सत्यांचा पाया आहे जे तु आमच्यासाठी ठेवलेले आहे ज्याद्वारे आम्ही जगावे आणि विश्वास ठेवावा.

3 आणि आम्ही फक्त इथे जमलेल्या या समुहासाठीच नव्हे, तर जगभरातील सर्वांसाठी प्रार्थना करतो, कारण आम्ही त्याच्या परत येण्याची आतुर डोळ्यांनी आणि तळमळीने वाट पाहत आहोत. आज आपण अंधारात, अशा गोंधळात उभे आहोत, की जेव्हा, बहुतेक केव्हाही, कोणी वेडा मनुष्य एखाद्या गोष्टीचा स्फोट घडवून आणू शकतो, आणि छोटेसे बटण दाबताच, आणि संपूर्ण जग तुकड्यांमध्ये उडवले जाऊ शकते. जसे महान अधिकाऱ्यांद्वारे आपल्याला सांगितले आहे, की, जर ते पुन्हा घडले, तर ते युद्ध फक्त काही तासांचे असेल. अरेरे! आज आपण आणखी एका युद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहोत. मग, मंडळी काठावर उभी आहे, ते सर्वात गौरवशाली पुनरुत्थान, कारण आपण प्रभूला हवेत भेटण्यासाठी, आणि सदैव त्याच्याबरोबर राहण्यासाठी, झोपी गेलेल्या संतांबरोबर एकत्र वर घेतले जाऊ.

4 प्रभू, आम्ही तुझी उपासना करण्यास आलो आहोत. आणि आज आमचा स्वीकार कर. तुझ्या वचनाचे वाचन, गाण्यांचे गायन, सुवार्तेचा प्रचार आशीर्वादित कर, पश्चात्ताप करणाऱ्यांच्या प्रार्थनांचा स्वीकार कर. आजारी लोकांसाठी केलेल्या प्रार्थना ऐक आणि तुलाच गौरव मिळू दे, कारण आम्ही ही विनंती तुझा पुत्र येशूच्या नावाने नम्रपणे करतो. आमेन.

5 आज सकाळी तुला आम्हाला त्याकडे घेऊन जायला आवडेल जे आम्ही वाचणार आहोत, आमच्या शास्त्रलेखासाठी…

6 आणि आम्ही हे जाणून दिलगीर आहोत की—की आमच्याकडे बसण्याची जागा नाही ह्या चांगल्या लोकांच्या समुहासाठी जे आज पहाटे आमच्याबरोबर आराधना करण्यासाठी आले आहेत, वेगवेगळ्या चर्चमधून आणि वेगवेगळ्या राज्यांमधून, आणि अगदी वेगवेगळ्या राष्ट्रांमधून, परमेश्वराच्या या सर्वात गौरवशाली उपासनेसाठी आज सकाळी येथे ह्या आराधनालयात जमले आहे.

7 तुम्ही स्तोत्रसंहितेच्या पुस्तकाकडे वळावे अशी माझी इच्छा आहे, स्तोत्रसंहिता 22. मला माहित आहे की ईस्टर सभेसाठी वाचण्यासाठी हे एक असामान्य वचन आहे, परंतु देव असामान्य आहे.

8 आणि आता या सभेनंतर, आम्ही सुमारे एक तासाकरिता थांबवू, जेणेकरून तुम्ही तुमच्या नाष्ट्यासाठी जाऊ शकता. आणि मग सन्डे स्कूल सभा साडेनऊ वाजता सुरू होईल. आणि त्यानंतर लगेचच रविवारच्या सभे नंतर, येथे बाप्तिस्म्याची सभा ह्या—ह्या लहान तलावाकडे होईल. आणि मग आज दुपारी, सहा वाजता, आज रात्रीच्या, आरोग्य सभेसाठी प्रार्थना पत्रके दिली जातील. आणि जर तुमची कोणी प्रिय व्यक्ती आजारी आणि गरजू असेल तर त्यांना आज रात्री आणण्याचे लक्षात ठेवा, आणि, ही शेवटची वेळ असेल आपण ती काही—काही वेळाकरिता, काही करून ठेवू शकू. मी सकाळी पाच वाजता, लॉस एंजेलिस आणि वेस्ट कोस्ट मार्गे सभांच्या मालिकेसाठी निघत आहे.

9 आता स्तोत्रसंहिता 22 मध्ये, आपण वाचूया.

> *माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास? माझा दु:खाचा आक्रोश ऐकून,...माझा बचाव करण्यास तू का जवळ नाहीस?*
>
> *...माझ्या देवा, मी दिवसा धावा करतो, पण तू ऐकत नाहीस; आणि रात्रीही धावा करतो, आणि मी गप्प बसत नाही.*
>
> *पण इस्राएलच्या स्तवनात वसणाऱ्या, तू पवित्र आहेस.*
>
> *आमचे पूर्वज तुझ्यावर भाव ठेवत: ते तुझ्यावर भाव ठेवत असत आणि तू त्यांना मुक्त करत* होतास.
>
> *ते तुझा धावा करत, आणि मुक्त होत: ते तुझ्यावर भाव ठेवत, आणि निराश होत नसत.*
>
> *पण मी तर एक कीटक आहे, आणि मानव नव्हे; मनुष्यानी निंदलेला,... लोकांचा धिक्कारलेला आहे.*
>
> *मला पाहणारे सर्व माझा उपहास करतात: ते वाकुल्या दाखवतात,* आणि *थट्टेने डोके डोलावतात, म्हणतात,*
>
> *त्याने परमेश्वरावर हवाला टाकला आहे: तो त्याला मुक्त करो: तो त्याला सोडवो, कारण तो त्याचा* आवडता आहे.
>
> *पण मला उदरातून बाहेर आणणारा तूच आहेस: मी आपल्या आईच्या अंगावर पीत होतो तेव्हा तू मला तुझ्यावर भाव ठेवण्याची स्फूर्ति दिलीस.*
>
> *मी जन्मलो तेव्हापासून मला तुझ्या हाती सोपवलेले आहे: मातेच्या उदरातून बाहेर पडलो तेव्हापासून तूच माझा देव आहेस.*
>
> *माझ्यापासून दूर राहू नकोस; कारण संकट येऊन ठेपले आहे; कारण सहाय्य करणारा कोणी नाही.*
>
> *पुष्कळ गोऱ्ह्यानी मला घेरले आहे: बाशानातील दांडग्या गोऱ्ह्यानी मला* घेरले आहे.
>
> *फाडून टाकणाऱ्या आणि...गर्जना करणाऱ्या सिंहासारखे ते तोंड वासून माझ्यावर आले आहेत.*

मी पाण्यासारखा ओतला गेलो आहे,...माझ्या हाडांचे सर्व सांधे ढिले झाले आहेत: माझे हृदय मेणासारखे झाले आहे; ते माझ्या आतल्या आत वितळले आहे.

माझी शक्ती यातून खापरीसारखी झाली आहे;...माझी जीभ माझ्या टाळूला चिकटली आहे. आणि तू मला मरणाच्या धुळीस मिळवत आहेस.

कारण कुत्र्यांनी मला वेढले आहे: दुर्जनांच्या टोळीने मला घेरले आहे: त्यांनी माझे हातपाय विंधले आहेत.

मला माझी सर्व हाडे मोजता येतात: की ते माझ्याकडे पाहतात आणि टक लावून पाहतात.

ते माझी वस्त्रे आपसात वाटून घेतात,...माझ्या झग्यावर चिठ्ठ्या टाकतात.

...हे परमेश्वरा, तू माझ्यापासून दूर जाऊ नकोस: ...माझ्या सामर्थ्या, माझ्या सहाय्यासाठी त्वरा कर.

तु माझा जीव तलवारीपासून सोडव; कुत्र्याच्या पंजातून माझा प्राण सोडव.

सिंहाच्या जबड्यापासून मला वाचव: कारण रानबैलांनी मला शिंगावर घेतले असता तु माझा धावा ऐकला.

मी आपल्या बांधवांजवळ तुझ्या नावाची कीर्ती वर्णीन: मंडळीमध्ये तुझी स्तुती करीन.

होय...परमेश्वराचे भय धरणाऱ्यांनो, त्याची स्तुती करा; याकोबाच्या सर्व वंशजांनो, त्याचा गौरव करा; सर्व इस्राएल वंशजहो त्याचे भय धरा.

कारण त्याने पीडितांची दैन्यवस्था तुच्छ लेखली नाही किंवा तिचा वीट मानला नाही...त्याने आपले मुख त्याच्यापासून लपवले नाही; पण जेव्हा त्याने त्याचा धावा केला, तेव्हा त्याने ऐकला.

महामंडळात तुझ्यामुळेच मी स्तवन करतो: जे लोक त्याचे भय धरतात त्यांच्यापुढे मी आपले नवस फेडीन.

दीन अन्न सेवन करतील आणि तृप्त होतील: परमेश्वराला शरण जाणारे त्याची स्तुती करतील: तुमचे हृदय सदैव जिवंत राहील.

दिगंतरीचे सर्व लोक स्मरण करतील आणि परमेश्वराकडे वळतील: आणि सर्व राष्ट्रे त्याच्यापुढे दंडवत घालतील.

कारण राज्य परमेश्वराचे आहे: आणि तो राष्ट्रांचा शास्ता आहे.

पृथ्वीवरील सर्व थोर लोक भोजन करतील आणि भजतील: धुळीस मिळणारे सर्व त्याच्यापुढे नतमस्तक होतील: आणि ज्याला आपला जीव वाचविता येत नाही तोही नमेल.

त्यांचे वंशजही त्याची सेवा करतील; पुढील पीढीच्या लोकांना प्रभूविषयी कथन करतील.

तेही येतील, आणि भावी पिढीला त्याचे नीतिमत्व घोषित करतील आणि करतील...त्यानेच हे सिद्धीस नेले, असे ते म्हणतील.

10 प्रभू वाचल्या गेलेल्या वचनावर त्याचा आशीर्वाद देवो. मला आज सकाळी या प्रसंगासाठी, पाच शब्द बोलायचे आहेत, आणि त्या पाच शब्दांच्या द्वारेच आज सकाळी

तुम्हा उपासकांसमोर, माझ्या हृदयात काय आहे ते व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. मला हे पाच शब्द हवे आहेत: *जगणे, मरणे, पुरणे, उठणे, पुन्हा येणे.*

11 आणि मला वाटते की, कवीने हे त्या गाण्यामध्ये चांगल्याप्रकारे व्यक्त केले आहे जे मला काय म्हणायचे आहे, जेव्हा त्याने हे गीत लिहिले.

> जिवंत असता, त्याने माझ्यावर प्रेम केले; मरताना, त्याने मला
> तारण दिले;
> पुरण्याने, त्याने माझी पापे वाहून दूर नेली;
> उठण्याने, त्याने मुफ्तपणे कायमचे न्यायी ठरविले:
> एके दिवशी तो येत आहे—होय, गौरवयुक्त दिवस!

12 आजतगायत त्याच्यासारखे जीवन कधीही कोणी जगले नाही, कारण तो देव देहात प्रकट झालेला होता जेव्हा तो जन्माला आला. देव पिता काय आहे याचे सदृश प्रतिरूप तो होता. आणि देव पिता प्रेम असल्याने, तर येशू प्रेमाचे पूर्ण प्रतिरूप होता. तो सुरवातीपासून प्रेम होता जेव्हा त्याने कोमल बाळ हातांनी त्याच्या आईच्या सुंदर गालावर स्पर्श केला. तो प्रेम होता.

13 आणि आज मला वाटतं की तो प्रेम होता हे ओळखण्यात अनेकजण अपयशी ठरत आहेत. “देव प्रेम आहे, आणि जे प्रेम करतात ते देवापासून जन्मलेले आहेत.”

14 “देवाने जगावर इतकी प्रीती केली, की, ज्यांच्यावर प्रेम करू शकत नाहीत, त्यांच्यासाठी त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, यासाठी की जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये, तर त्याला सार्वकालिक जीवन मिळावे.”

15 जेव्हा तो पृथ्वीवर होता तेव्हा त्याने आपले प्रेम व्यक्त केले, अनेक वेगवेगळ्या मार्गांनी, जोपर्यंत हे निर्विवाद आहे की तो आतापर्यंत जगलेल्यामध्ये सर्वाधिक प्रेमळ व्यक्ती होता. आणि मला वाटतं, इथे त्याच्या जीवनांतून, तो देवाला प्रकट करीत होता. आणि देवाला लोकांसमोर प्रकट करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे प्रेम आहे.

16 आणि त्याने हे उत्तम रीतीने केले जेव्हा त्याने त्याच्या काळातील कदाचित, सर्वात वाईट स्त्रीला पकडले. जेव्हा ती व्यभिचार करताना सापडली, तेव्हा त्यांना ती फक्त दोषी दिसली, आणि त्यातून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग नव्हता. आणि त्यांनी तिला त्याच्यासमोर ओढून आणले, आणि म्हणाले, “आपण हिच्याविषयी काय म्हणता?”

17 आणि जेव्हा तो तिच्याकडे वळला, आणि, म्हणाला, “मी तुला दंड ठरवत नाही. जा आणि ह्यापुढे पाप करू नको.” तिला रस्त्यावर फेकून देण्याऐवजी, की तिच्यावर लांडग्यांचा समूह तुटून पडावा, तिला दगडमार करण्यासाठी आणि तिचा जीव घेण्यासाठी; त्याचे कोमल, दयाळू, प्रेमळ हृदय ती ज्या पापात होती त्या पापाकडे झुकले, म्हणाला, “मी तुला दंड ठरवत नाही. फक्त जा आणि ह्यापुढे पाप करू नको.”

18 आणि जेव्हा तो लाजरच्या थडग्याकडे जात होता, मला वाटते की ही आणखी एक महान वेळ होती की देव मानवांसाठी काय आहे हे त्याने व्यक्त केले. तो केवळ एक देव नाही जो सर्वात हीन पापाची क्षमा करू शकतो जे केले जाऊ शकते, आणि त्याच्या क्षमाशील प्रेमाद्वारे, पाप्यांना घेतो आणि त्यांना निर्दोष बनवतो, परंतु जरी मृत्यूने आपल्याला शांतीत नेले, तरीही त्याला आपली काळजी वाटते. मला वाटते की हे त्याने मार्था आणि मरियेसोबत असताना चांगल्या प्रकारे व्यक्त केले आहे, जेव्हा तो त्या घरात येतो जिथे मृत्यूने एका प्रिय व्यक्तीचे आयुष्य बंदिस्त केले होते. आणि कबरेकडे त्याच्या वाटेवर, तरीही, देव असल्यामुळे, तो त्याला मेलेल्यांतून उठवेल हे माहीत होते, त्याला

ठाऊक होते की हे त्याला सांगण्यात आले होते की त्याच्याच शब्दात त्याला कबरेतून उठवण्याचे सामर्थ्य घातलेले आहे; तरीही, जेव्हा त्याने मार्था आणि मेरी आणि लाजरवर प्रेम करणाऱ्यांना रडताना पाहिले, तेव्हा बायबल म्हणते की तो रडला. काय होतं ते? त्याचे महान प्रेमळ हृदय! जेव्हा त्याने त्या मनुष्याला पाहिले, आणि त्याचे—त्याचे मित्र समस्येत होते, तो ही त्यांच्यासह समस्येत होता.

19 मला हे जाणून खूप आनंद होतो की तो भग्न हृदयी लोकांमध्ये असतो. तो असा नाही, की जो आपल्याला आपल्या दु:खात सोडून जाईल. जेव्हा सर्व काही अयशस्वी होते आणि पृथ्वीवर पोहोचण्याची शेवटची आशा संपुष्टात येते, तेव्हाही तो आपल्या पाठीशी उभा राहतो, तो तरी ही देव आहे आणि तो आपल्यावर प्रेम करतो. तो देवाला प्रकट करीत होता.

20 आणि, होय, मी किती विश्वास करतो की त्याची इच्छा आहे की त्याचे लोक त्याच्या आत्म्याने इतके अभिषिक्त व्हावे, की आपण परीक्षांमध्ये आणि संकटांमध्ये एकमेकांकडे जाऊ शकू, आणि त्याची सहानुभूती प्रकट करू शकू, जसे ते आपल्या अंतःकरणातून ओतले जाते जे त्याच्या आत्म्याने जन्मलेले आहेत, ह्यासाठी की चर्चमध्ये जिवंत देवाचे प्रेम प्रतिबिंबित करावे. त्याने जे सांगितले, किंवा कवीने जे म्हटले, ते उत्तम प्रकारे व्यक्त केले आहे, "जगण्याद्वारे, त्याने माझ्यावर प्रेम केले!"

21 त्याने संपूर्ण मानवजातीसाठी काय केले ते त्याने दाखवले, ज्या प्रकारे देवाने येशू ख्रिस्तामध्ये स्वतःचे प्रतिनिधित्व केले. त्याने मानवजातीसाठी आपले मत व्यक्त केले, ज्यांच्यावर प्रेम केले जाऊ शकत नाही त्यांना क्षमा करावी आणि त्यांच्यावर प्रेम करावे. आणि मला आश्चर्य वाटते की, या इस्टरच्या सकाळी, आपण त्या बाबतीत किती कमी पडतो. जे आपल्यावर प्रेम करतात त्यांच्यावर आपण प्रेम करू शकतो, परंतु ज्यांनी त्याच्यावर प्रेम केले नाही त्यांच्यावर त्याने प्रेम केले.

22 तो पृथ्वीवर प्रेमाचे सर्वात महान, प्रथम प्रतिनिधित्व, करणारा होता; आणि ज्या पृथ्वीवर राहणाऱ्यांचा तिरस्कार केला गेला, त्यांच्यावर त्याने प्रेम केले. कोणीही मनुष्य त्याच्यासारखे प्रेम करू शकला नाही; आणि कोणाही मनुष्याचा त्याच्यासारखा कधीही द्वेष केला गेला नाही. त्यांनी त्याचा द्वेष केला आणि त्याचा तिरस्कार केला, आणि त्याला नाकारले, परंतु यामुळे त्याचे प्रेम थांबले नाही. शेवटी, जेव्हा तो वधस्तंभावर टांगलेला होता, त्यानंतर जे जीवन तो जगला त्यामध्ये चांगल्या गोष्टींशिवाय काहीही नव्हते, अपराध्याना क्षमा करणे, आजारी लोकांना बरे करणे, आणि अशा गोष्टी केल्या ज्या चांगल्या होत्या. जेव्हा तो…वधस्तंभावर शेवटचा श्वास घेत होता, असभ्य, उपहासाने थुंकणारे, ते लोक जे त्याच्या जवळ उभे होते, लटकत असताना त्याचा पवित्र चेहरा प्रेमाने भरलेल्या हृदयाने, त्याने आरोळी मारली, "पित्या, त्यांना क्षमा कर, कारण ते काय करतात हे त्यांना माहीत नाही."

23 तो समजू शकत होता. देव असल्याने, तो समजतो. म्हणूनच तो आपल्यावर प्रेम करू शकला, जेव्हा आपण त्या प्रेमासाठी योग्य नव्हतो, कारण तो देव आहे आणि तो समजतो. "जगण्याने, त्याने माझ्यावर प्रेम केले." असे आयुष्य कधीच जगण्यात आले नाही, कारण ते प्रेमात गुंफलेले होते.

24 "मरताना, त्याने मला वाचवले." जेव्हा एदेन बागेत, यहोवा देवाला, एका मृत्यूची गरज होती, पापाचा दंड मृत्यू होता, आणि तेथे बदल होऊ शकत नव्हते. ते इतर कोणत्याही मार्गाने होऊ शकत नव्हते. कारण, देव सर्वोच्च आहे, आणि तो अनंत आहे, आणि संपूर्ण आकाश आणि पृथ्वीचा न्यायाधीश आहे. पापाचा दंड मृत्यू होता, आणि

तेथे कोणीही नव्हते जो हा दंड दुसऱ्याकरिता घेऊ शकेल. कारण प्रत्येक मनुष्य, जरी तो कदाचित दुसऱ्या मनुष्यासाठी मरण पावेल, तरी पण तो प्रारंभापासूनच पापी आहे. आपल्यापैकी कोणीही दुस–याला मदत करु शकत नव्हता, कारण आपण सर्वजण पापी होतो. “आपण पापात जन्मलो, अधर्मात वाढलो, जगात खोटे बोलत आलो.” आणि तेथे कुठेही, आशेचा किरण दिसत नव्हता. देवाद्वारे, आम्हाला मृत्यूदंडाची शिक्षा मिळाली होती, आणि पृथ्वीवर आतापर्यंत असलेला प्रत्येक प्राणी ह्या दंडाखाली होता. तेथे नीतिमान पुरुष उदयास येऊ शकत होते आणि महान गोष्टी करू शकत होते, परंतु ते सुरुवातीपासूनच पापी होते.

25 ती किंमत चुकविण्याचा केवळ एकच मार्ग होता, आणि तो म्हणजे स्वतः देवाचा मृत्यू होणे. म्हणून देव, एक आत्मा असल्याने, मरू शकत नव्हता, परंतु तो एका मानवी शरीरात खाली उतरला आणि स्वतःला एका प्रेमस्वरूपी जीवनात प्रकट केले; ह्यासाठी की तो सर्व चांगुलपणा जो त्याच्यामध्ये होता तो घेऊ शकेल, आणि ते सर्वोच्च बलिदान स्वेच्छेने देऊ शकेल, यासाठी की त्याने अपराध्यांचा अपराध घ्यावा. आपण सर्वजण पापी असल्याने, आणि आपल्यासाठी जगामध्ये एकही तारणाचा मार्ग नव्हता. तो पृथ्वीवर केवळ दिसण्यासाठी आला नाही, तर तो बलिदान म्हणून मरण्यासाठी आला.

26 हाबेलने हे प्रकट केले जेव्हा त्याने देवाला काइनापेक्षा उत्कृष्ट यज्ञ अर्पण केला; जेव्हा त्याने लहान कोकरू एका खडकाजवळ आणले, ज्याच्या गळ्याच्या सभोवती द्राक्षवेलीचा तुकडा गुंडाळलेला होता. तिथे त्या छोट्या बच्च्याला खडकावर ठेवले, त्याची छोटी हनुवटी मागे खेचली आणि एका—एका दगडाने, त्याचा छोटासा गळा कापला; आणि ते किंचाळित आणि मरत होते आणि रक्त बाहेर पडत होते, आणि त्याचे लहान पांढरे केस रक्ताने न्हाऊन निघाले होते. हाबेलाने तेथे कलवरी प्रकट केली.

27 जेव्हा देवाचा कोकरा, जगाच्या स्थापनेपासून मारला गेलेला, दोषी पाप्याची जागा घेण्यासाठी आला, आणि ठेचला गेला आणि जखमी केला गेला, आणि—आणि थट्टा आणि चेष्टा केली गेली, आणि अशा मृत्यूने मरण पावला की स्वतः देवाशिवाय कोणताही प्राणी मरू शकत नव्हता, आणि त्याचे केस त्याच्या खांद्यावर लटकत होते, त्यांच्यातून रक्त जमिनीवर टपकत होते, हे प्रकट करीत होते की पाप किती भयानक आहे, जेव्हा मनुष्याला पापी जीवनातून सोडवण्यासाठी त्याला मरावे लागले. असे कोणीही मरू शकत नव्हते. कोणीही तो मृत्यू सहन करू शकत नव्हते. त्यात म्हटले आहे की, “जेव्हा त्यांनी त्याच्या कुशीत खुपसले, तेव्हा, तेथून रक्त आणि पाणी बाहेर आले.”

28 काही समया पूर्वीची गोष्ट आहे, मी याबद्दल कोणाशी तरी बोलत होतो. आणि तो एक शास्त्रज्ञ होता जो म्हणाला, “असे घडू शकण्याचा एकच मार्ग आहे. आणि तो रोमन भाला खुपसण्यामुळे, तो मेला असे नाही; आणि रक्त निघून गेल्यामुळेही, तो मृत्यू पावला नाही, कारण त्याच्या शरीरात अजूनही रक्त होते. त्याचा जो मृत्यू झाला, तो रोमन भाल्यामुळे किंवा त्याच्या हाता ठोकलेल्या खिळ्यांमुळे झाला नाही, किंवा त्यांनी त्याच्या डोक्यावर ठेवलेल्या काटेरी मुकुटामुळे झाला नाही. पण ह्यामुळे...तो दुःखाने मरण पावला, कारण तो त्याच्या स्वकीयांकडे आला आणि त्याच्या स्वकीयांनी त्याला स्वीकारले नाही. हृदय तुटल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. जेव्हा, त्याला ठाऊक होते की त्या वेळच्या प्राण्यांना, मुक्ती देण्यासाठी तो त्यांच्यासाठी मरणार आहे, ज्यांनी त्याच्या तोंडावर थुंकले होते, आणि त्याला मनुष्यानी नाकारले होते.”

29 हे घडण्याच्या आठशे वर्षांपूर्वी, दाविद, कालवरीवर त्याने त्याच वाणीसह आरोळी केली होती जशी त्याने आरोळी केली, “माझ्या देवा, तू मला का सोडलेस?”

30 पाप किती भयंकर गोष्ट करते, ते मनुष्याला देवापासून वेगळे करते! आणि तो पापार्पण होता जो आपल्या पापांसाठी अर्पण करावा लागणार होता. आणि त्याला देवाच्या उपस्थितीपासून वेगळे करण्यात आले. पापाने त्याला वेगळे केले होते. देवाने आपली पापे त्याच्यावर ठेवली, आणि त्याला देवापासून वेगळे करण्यात आले होते, आणि म्हणूनच त्याने आरोळी केली, “तू मला का सोडलेस?” आणि कारण त्याला वेगळे करण्यात आले होते, आणि त्याने ही जागा घेतली होती, आणि त्याच्या लोकांना पाहिले, की तो त्यांचा तारणारा म्हणून आला होता आणि त्यांना जीवन देण्यासाठी आला होता, त्यांनी त्याला नाकारले होते, आणि त्यामुळे त्याला दु:ख झाले, त्यामुळे, तो इतका भग्न–हृदयी झाला की रक्त आणि पाणी, आणि त्याच्या शरीरातील रसायने, वेगळे झाले.

31 ते काय होते हे मानवाला कधीच कळणार नाही. हेच कारण आहे की अशा प्रकारे कोणीही मनुष्य मरु शकत नाही. मला ह्याची पर्वा नाही की तुम्हाला कितीही त्रास दिला जाईल, ते तुमच्या पायांना कितीही लाकडामध्ये ठोकतील, किंवा तुम्हाला थोडे थोडे कापतील, किंवा इंच इंचांनी तुम्हाला जाळतील; तुम्ही त्या मृत्यूने मरू शकत नाही, कारण तुम्हाला तसे बनविले गेले नाही. त्याला देव असणे गरजेचे होते. त्याला मनुष्यापेक्षा, जास्त असायला हवे होते. आणि तसा, विचार करणे, की, देव मेला. तो भग्न हृदयाने, जगासाठी अशा दुःखाने, मरण पावला, जोपर्यंत त्याच्या शरीरात रासायनिक प्रतिक्रिया घडत नाही जी तुमच्यामध्ये होऊ शकत नाही. तुम्ही असा त्रास सहन करू शकत नाही. तेथे असा कोणताही मार्ग नाही की तुम्ही अशा प्रकारचे दुःख सहन करावे. म्हणून तेथे केवळ एकच होता जो ते करू शकत होता, आणि त्याने ते केले.

32 तेथे लटकलेले, ते मौल्यवान जीवन ज्याला प्रेम आणि चांगले करण्याशिवाय काहीही माहित नव्हते, त्याला स्वर्ग आणि पृथ्वीच्या मध्ये टांगले, तेथे वर उचलले, निवस्त्र केले, लज्जित केले. विचार करा, तुम्हाला नग्न केले तर कसे वाटेल; तुम्हाला कळणार नाही की कसा देव लज्जास्पद स्थितीत, तिथे टांगलेला होता. मला माहित आहे की वधस्तंभावर एक छोटीशी गोष्ट असते, जसे की त्यांच्याभोवती काहीतरी लपेटलेले होते, परंतु त्यांनी तसे केले नव्हते. ते फक्त वधस्तंभावर दाखवले आहे, किंवा कलाकाराने ते तेथे बनवले आहे. त्यांनी त्याच्यापासून त्याचे कपडे काढून घेतले. त्याच्या अंगावर एक झगा होता, आणि त्यांनी तो त्याच्यापासून घेऊन फाडला आणि त्यावर चिठ्ठ्या टाकल्या. त्याला लज्जित केले गेले. तरीही, देव असल्याने, त्याला ते सहन करावे लागले, आणि पापी त्याच्या तोंडावर थुंकले. तरीही, त्या–त्या अति नम्रतेने, त्याला लोकांसमोर नग्न अवस्थेत, मरावे लागले. त्याच्यावर त्याचा असा परिणाम झाला, की त्यामुळे पाणी आणि रक्त वेगळे झाले. ह्यात काहीही आश्चर्य नाही...मला वाटते की कवीने ते उत्तम प्रकारे प्रकट केले आहे जेव्हा त्याने म्हटले:

> त्या फुटणाऱ्या खडकाच्या मध्यभागी आणि अंधकारमय आकाशांमध्ये,
> माझा तारणाऱ्याने त्याचे मस्तक लवविले आणि मरण पावला;
> परंतु त्या फाटलेल्या पडद्याने मार्ग प्रकट केला
> स्वर्गातील आनंदाकडे आणि अनंत दिवसाकडे जाण्याचा.

33 निश्चितच, त्याला ते करावे लागणार होते. मनुष्य आणि देव यांच्यामध्ये एक पडदा टांगलेला होता, आणि त्या फाटलेल्या पडद्याने स्वर्गाच्या आनंदाचा आणि अनंत दिवसाचा मार्ग प्रकट केला. कालवरी म्हणजे अशी गोष्ट, म्हणजे आपण व्यक्त करू शकतो त्याहून अधिक. नक्की.

जगण्याद्वारे, त्याने माझ्यावर प्रेम केले; मरण्याद्वारे, त्याने मला
तारण दिले;
गाडण्याद्वारे, त्याने माझी पापे खूप दूर वाहून नेली.

34 आता त्याला दोषी ठरविण्यात आले आहे. पापाची ह्यापुढे सत्ता नाही. जेव्हा त्याने वधस्तंभावर आरोळी केली, "पूर्ण झाले आहे," पाप मरण पावले आहे! आता ते मृत झाले आहे. ते नष्ट केले आहे. ते शक्तिहीन आहे. ते निर्जीव आहे. लोकांनो, याचा विचार करा. ते पाप, मनुष्य जातीचा शत्रू, मृत आणि निर्जीव आहे, त्याचा कोणताही प्रभाव नाही. ते काही करू शकत नाही. ह्यात काहीही आश्चर्य नाही की सूर्याने आपला प्रकाश बंद केला, ताऱ्यांनी चमकणे बंद केले, पृथ्वी अंधकारमय झाली, हे सर्व मुक्त केले जात होते.

35 आता ते मृत आहे, ते गाडले गेले आहे, ते निर्जीव आहे. त्यात आणखी जीवन नाही, मग ते गाडलेच पाहिजे. काय गाडले होते? देवाचे शरीर पुरण्यात आले, कारण ते पापार्पण होते. तो जाळलेला कोकरा होता, तो अधर्माच्या अग्नीने जाळून टाकला होता. तो पापरहित कोकरा ज्याला पाप ठाऊक नव्हते, तो देव ज्याला चूकीचे काही माहीत नाही; त्याचे जीवन दिले गेले होते, आणि तेथे पापार्पण टांगले होते. "दफन केले, त्याने माझी पापे वाहून खूप दूर नेली." त्याला पुरले पाहिजे. ते शरीर, पापार्पण दफन केले पाहिजे.

36 म्हणूनच अनेकजण, काही वेळानंतर, एक एक करून, येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घेण्यासाठी ह्या तलावाकडे जातील. का? काहीतरी घडले आहे. तो आत्मा जो त्या शरीरातून बाहेर आला, जेव्हा त्याने आरोळी मारली, "पूर्ण झाले आहे," त्याने आपल्या शरीरातील पापाचा निषेध केला आहे. आणि आपण ते दफन केले पाहिजे, ह्यासाठी की ह्यापुढे आपण त्याचे स्मरण करू नये. मला खूप आनंद झाला की असे झालेले आहे.

37 जेव्हा काहीही दफन केले जाते, तेव्हा ते लपवले जाते, ते दृष्टीआड होते. "आणि गाडल्याने, त्याने माझी पापे खूप दूर नेली." देव आपली पापे ह्यापुढे पाहू शकत नाही, कारण ती पुरली आहेत. ती कुठे पुरली आहेत? विस्मरणाच्या समुद्रामध्ये. विस्मरणाच्या समुद्राचा विचार करा! देव ती यापुढे आठवू शकत नाही, कारण ती दोन्ही मेलेली आणि पुरली गेलेली आहेत. त्यांचे आता स्मरणही ठेवता येणार नाही. ती देवाच्या स्मरणाबाहेर आहेत.

38 तो हे देखील..."पुरणे" ह्यामध्ये त्याने जुन्या करारात प्रतिनिधित्व केले. त्यांच्याकडे दोन होते...पवित्रस्थानाच्या शुद्धीकरणाच्या वेळी त्यांच्याकडे पापार्पण होते. आणि ते पापार्पण असे की ते दोन बकरे घेत असत आणि एक बकरा मारत असत; आणि दुसरा बकरा, त्या मेलेल्या बकऱ्यावर जी पापे ठेवली होती ती जिवंत बकऱ्यावर टाकत.

39 लक्षात ठेवा, येशू एक कोकरा होता. तो एक कोकरू होता, पण या प्रकरणात तो बकरा बनला. तो नीतीमत्व होता कारण तो देव, मेंढी होता. पण तो एक बकरा, पाप म्हणून आला, ह्यासाठी की तो माझ्यासाठी आणि तुझ्यासाठी पापार्पण होऊ शकेल; एक कोकरयाहून एक बकरा बनला.

40 आणि येशू ह्या दोन्ही प्राण्यांमध्ये, दोन्ही बकऱ्यांमध्ये प्रतिनिधित्व करीत होता: एक तर, प्रायश्चितासाठी तो मरण पावला—तो मरण पावला; दुसरा, प्रायश्चित्तातील पापे बळीच्या बकऱ्यावर टाकण्यात आली, आणि बळीचा बकऱ्याने लोकांची पापे आपल्यावर घेतली आणि लोकांची पापे वाहण्यासाठी, दूर रानात गेला. ते काय होतं? ते आपल्या प्रभु येशूचा मृत्यू आणि दफन दर्शवीत होते. "मरण्याने...जगून, त्याने माझ्यावर प्रेम केले. मरून, त्याने मला वाचवले. गाडण्याने, त्याने माझी पापे खूप दूर नेली." त्याने लोकांची

पापे स्वतःवर घेतली, आणि त्यांना खालच्या अधोलोकात खालील भागात नेले. तो पापार्पण होता. त्याच्याकडे लोकांची पापे होती. त्यांच्यासाठी तो मरण पावला. आणि पापं देखील त्याच्यावर लादण्यात आली, आणि त्याने आपली पापे इतकी दूर नेली, की देव त्यांना कधीही पाहू शकत नाही. याचा विचार करा! होय, मंडळी ओरडू शकते, “हालेलुया अशा तारणकर्त्यासाठी!”

41 केवळ आपल्या पापांची क्षमा केली गेली नाही, तर ते विस्मरण्याच्या समुद्रात गाडले गेले आहेत, यापुढे त्यांचे स्मरण होऊ नये. “गाडल्याने, त्याने आपली पापे दूर वाहून नेली.” आता त्यांची आठवण येऊ शकत नाही, कारण ते नष्ट झाले आहेत. ते देवाच्या नजरेच्या बाहेर आहेत. त्यांना पक्षाघात झाला आहे. त्यांचा घटस्फोट झाला आहे. त्यांना दूर केले आहे. देव यापुढे त्यांना आठवत नाही. काय? मंडळीने आज सकाळी आनंद केला पाहिजे, हे जाणून की आपली पापे यापुढे आठवली जाणार नाहीत. त्यांना विस्मरणाच्या समुद्रात, कोणत्याही पुनरुत्थानाच्या पलीकडे असलेल्या थडग्यात टाकले आहे. ते कायमचे मेले आहेत, आणि विसरलेले आहेत. ते जणू कधीच घडलेच नव्हते. “मरण्याने, त्याने मला वाचवले.” परंतु, “गाडण्याने, त्याने माझी पापे खूप दूर नेली.” विस्मरणाच्या समुद्रात जाईपर्यंत तो त्यांना घेऊन गेला. होय! आपल्याला माहित आहे की त्या गोष्टी आपल्यामध्ये निश्चितपणे विश्वास ठेवल्या जातात, आणि त्या निश्चितपणे सत्य आहेत. ते देवाचे सत्य आहेत. त्या सर्व महान गोष्टी मानवी प्रकटीकरणाच्या पलीकडे होत्या. अशा गोष्टींबद्दल आम्ही कधीही कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही.

42 पण, होय, तो इस्टर! “उठण्याने, त्याने मुक्तपणे कायमचे न्यायी ठरवले.”

> जगण्याने, त्याने माझ्यावर प्रेम केले; मरण्याने, त्याने मला तारले;
> गाडल्याने, त्याने माझी पापे दूर वाहून नेली; (ते सर्व ठीक होते.)
> पण, उठण्याने, त्याने न्यायी ठरवले.

43 ते पुनरुत्थान काय होते? ती देवाची पावती होती, की किंमत चुकवली गेली आहे. “उठण्याने, त्याने फुकटवारी कायमचे न्यायी ठरवले.” ओह, काय तो पुनरुत्थीत, तारणारा आहे! देवाने काय केले होते? मानव दु:ख सहन करू शकतो, मानव मरू शकतो, मानव पुरला जाऊ शकतो. परंतु ईस्टर हा त्या सर्वांमध्ये सर्वात मोठा होता, कारण ती देवाची मान्यता होती, “माझे नियमशास्त्र पूर्ण झाले आहे, माझ्या गरजा पूर्ण झाल्या आहेत, तो तोच आहे!” त्याने त्याला मेलेल्यांतून उठवले! “उठण्याने, त्याने मुक्तपणे कायमचे न्यायी ठरवले.” धन्य त्याचे पवित्र नाव!

44 यात आश्चर्य नाही की ते भावना आणते! यात आश्चर्य नाही की मानवी हृदयात ते असू शकत नाही! होय, आपल्या विजयी विश्वासाद्वारे आपण पलिकडे उभे राहू शकतो आणि म्हणू शकतो, “आम्ही कायमचे, मुक्तपणे न्यायी ठरविले गेलो आहोत,” कारण तो मेला आणि त्याला पुरण्यात आले, आणि देवाने त्याला पुनरुत्थानाच्या सकाळी पुन्हा उठवले. तेव्हा, देवाने दाखवून दिले की त्याने केलेल्या सर्व गोष्टी स्वीकारल्या गेल्या. सर्व काही विनामूल्य दिले गेले, तुम्ही आता मुक्तपणे जाऊ शकता! “उठण्याने, त्याने विनामूल्य कायमचे न्यायी ठरवले.” होय, तो महान दिवस कोणीही कधीही जाणू शकत नाही, कधीही विचार करू शकत नाही जेव्हा तो पुनरुत्थीत झाला! आणि देवदूतांनी ते पाहिले. स्वर्गातील स्वर्गात, देवदूतांनी देवाची स्तुती गायली, आणि आनंद केला; जुन्या करारातील संतांसह, सुखलोकांत, “हल्लेलुया!” गात उठले, “उठण्याने, त्याने न्यायी ठरवले.” जेव्हा ती महान वाणी बाहेर आली, स्वर्ग हादरला, पृथ्वी हादरली, सुखलोक

हादरला, आणि स्वर्ग हादरला. तो कबरेतून उठला! “उठण्याने, त्याने विनामूल्य कायमचे न्यायी ठरवले.” ओह, किती, अद्‌भूत!

45 मग त्याच्यामध्ये मरणारे संत हे गाऊ शकतात, जेव्हा आपण त्या आश्चर्यकारक कृपेकडे पाहतो, त्याने काय केले ते पाहतो. समजले? देवाचे शिक्कामोर्तब मान्यता! “आता थोडा वेळ आणि जग मला आणखी पाहणार नाही, पण तुम्ही मला पहाल, कारण मी मेलेल्यांतून उठेन आणि जगाच्या अंता पर्यंत, तुमच्याबरोबर असेन, अगदी तुम्हामध्ये असेन; एक पुष्टी म्हणून, आणि एक प्रमाण म्हणून की देवाने जे सांगितले ते सत्य आहे, आणि मी जे म्हणतो ते सत्य आहे,” येशूने म्हटले. “मी पवित्र आत्म्याच्या रूपात येईन. मी माझे निवासस्थान तुझ्याबरोबर करीन आणि तुझ्याबरोबर सदैव राहीन.” मग ज्या संतांच्या मनात पुनरुत्थानाची आशा आहे, ते हे गीत गाऊ शकतात:

> त्या तेजस्वी आणि ढगविरहित सकाळी जेव्हा ख्रिस्तामध्ये मेलेले उठतील,
> आणि त्याच्या पुनरुत्थानाचा गौरवात भाग घेतील;
> जेव्हा त्याचे निवडलेले लोक आकाशाच्या पलीकडे त्यांच्या घरी जमतील, (एक परिपूर्ण आश्वासनासह, देवाच्या शिक्क्यासह, स्वतः देवाकडून लेखी पावतीसह,)
> जेव्हा तेथे नाव पुकारले जाईल, तेव्हा मी तिथे असेन. (होय, लवकर ये!)

होय, ते म्हणाले यात आश्चर्य नाही:

> जगण्याने, त्याने माझ्यावर प्रेम केले; मरण्याने, त्याने मला तारण दिले;
> गाडल्याने, त्याने माझी पापे दूर नेली; (ओह!)
> उठण्याने, त्याने विनामूल्य कायमचे न्यायी ठरवले.

46 पापांची क्षमा केली आहे. हे सर्व बलिदान दंत कथात्मक असू शकले असते, तर हे सर्व बलिदान अयशस्वी होऊ शकले असते. परंतु इस्टरच्या सकाळी, जेव्हा तो पुनरुत्थीत झाला, तेव्हा देवाने सिद्ध केले की त्याने ते स्वीकारले. ह्यात आश्चर्य नाही, हे मानवी हृदयाला हाल्लेलुया बोलण्यास लावते! यात काही आश्चर्य नाही त्यामुळे मानवांना मृत्यूसमोर उभे राहण्याचे सामर्थ्य प्रदान करते! ही गोष्ट लोकांना ह्या गोष्टी बोलण्यास लावते ज्या नाहीत, जणू काही त्या होत्या! पण का? “उठण्याने, त्याने न्यायी ठरवले.” तुम्ही हे कसे जाणता की तो पुनरुत्थीत झाला आहे? कारण, आपल्या अंतःकरणात त्याचा उदय झाला आहे, विनामूल्य कायमचे न्यायी ठरवले आहे!

47 चाळीस दिवसांनंतर, जेव्हा तो उभा होता, आपल्या मुलांशी बोलत होता, तेव्हा गुरुत्वाकर्षणाची पकड कमी होऊ लागली. कार्य पूर्ण झाली होती. किंमत चुकवली गेली होती. त्याच्या हातात पावती होती. ती देवाची पावती होती. त्याच्याकडे लेकरे होती, त्याची मंडळी, विश्वासणारे होते. सर्व पाप जिंकले गेले. मार्ग मोकळा केला होता. तो यापुढे पृथ्वीवर राहू शकला नाही. आम्हाला येथे काय धरून आहे? गुरुत्वाकर्षण. गुरुत्वाकर्षण तुटण्यास सुरुवात झाली, त्याची पकड गमावली. का? तेव्हा सगळं समाप्त झालं होतं. काय घडलं? तो पृथ्वीवरून उठण्यास सुरुवात झाली.

48 “तुम्ही सर्व जगात जा, आणि सर्व सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा,” त्याच्या ओठांचे उच्चार बाहेर येतात. “सर्व जगात जा, आणि सर्व सृष्टीला सुवार्ता सांगा. जो विश्वास धरतो आणि बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल, जो विश्वास धरत नाही तो शिक्षेस पात्र होईल.

आणि विश्वास धरणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असत जातील. ते माझ्या नावाने भुते काढतील. ते नवनव्या भाषा बोलतील. जर ते सर्प उचलतील किंवा प्राणघातक पदार्थ प्याले तरी तो त्यांना मुळीच बाधणार नाही. जर त्यांनी दुखणाइतांवर हात ठेवले तर ते बरे होतील. कारण मी जीवंत आहे...गुरुत्वाकर्षण माझ्यापासून तूटले आहे. पापाला पकड नव्हती. मी तुमच्यासाठी मेलो. देवाने ते सिद्ध केले, आणि पुनरुत्थानाची पावती दिली. आणि मी जीवंत आहे म्हणून तुम्हीही जीवंत राहाल! एके दिवशी मी परत येईन."

49 "एके दिवशी तो येत आहे, ओह, गौरवशाली दिवस!" मग, काय? जगणे, मरणे, पुरणे, उठणे, येणे, ही आज मंडळीची आशा आहे!

> जगण्याने, त्याने माझ्यावर प्रेम केले; मरण्याने त्याने मला तारण
> दिले;
> गाडले जाण्याने, त्याने माझी पापे दूर नेली;
> उठण्याने, त्याने विनामूल्य कायमचे न्यायी ठरवले:
> एके दिवशी तो येत आहे—होय, तो गौरवयुक्त दिवस!

काय होतं ते? पाच अक्षरात पाच गोष्टी, J–e–s–u–s.

> जगण्याने, त्याने माझ्यावर प्रेम केले; मरण्याने त्याने मला तारण
> दिले;
> गाडले जाण्याने, त्याने माझी पापे दूर नेली.
> उठण्याने, त्याने विनामूल्य कायमचे न्यायी ठरवले:
> एके दिवशी तो येत आहे—होय, तो गौरवयुक्त दिवस!

50 आपण त्याच्या दुसऱ्या आगमनाची वाट पाहत आहोत!

> आणि यापैकी काही चमकदार आणि ढगविरहित सकाळी जेव्हा
> ख्रिस्तामध्ये मेलेले उठतील,
> आणि त्या पुनरुत्थानाच्या गौरवाचे वाटेकरी होतील;
> जेव्हा त्याचे निवडलेले लोक आकाशाच्या पलीकडे त्यांच्या घरी
> जमतील,
> जेव्हा तेथे त्यांचे नाव पुकारले जाईल, तेव्हा मी तिथे असेन.

का? मला पावती मिळालेली आहे. तो उठला! तुम्हाला कसे माहीत? तो माझ्या हृदयात राहतो. तो त्याच्या विश्वासू मंडळीच्या हृदयात राहतो.

51 मित्रांनो, ह्यावर विचार करा. आपण परत येताच, बाप्तिस्म्याच्या सभेसाठी, कोमट पाण्यासह, जल कुंड काही क्षणांत तयार होईल.

आता क्षणभर आपण आपली मस्तके झूकवूया.

52 आज मला आश्चर्य वाटते, की आपल्यामध्ये एक असेल, किंवा अनेक असतील ज्याने अद्याप या बलिदानाचे ते स्वीकारण्याइतके कौतुक केले नाही, आणि तुमची इच्छा आहे की प्रार्थनेत तुमची आठवण केली जावी, की देव तुमच्या हृदयाशी वेगळ्या प्रकारे बोलेल, की तुम्ही त्याचे बलिदान स्वीकाराल, जे तुमच्या आत्म्याचे शुद्धीकरण करते.

53 आणि लक्षात ठेवा की आज आपण केवळ तो समय साजरा करीत नाही की आपण नवीन टोपी घालावी आणि नवीन कपडे घालावे; जे ठीक आहे, ते काहीतरी नवीन करण्याचे प्रतीक आहे. देवाने काहीतरी नवीन केले आहे. जे, सर्व ठीक आहे. ते केवळ एवढेच नाही. इस्टरचा अर्थ असा होत नाही. किंवा, इस्टर ससे किंवा बनी अंडी,

आणि लहान पांढरी कोंबडीची शिकार करणे, आणि अशा प्रकारे, भाऊ, इस्टरची ही कल्पना नाही.

54 इस्टर हा एक विजय आहे, हा तो विजय आहे जो देवाने पृथ्वीवर दिला, की त्याने स्वतःच्या पुत्राला मेलेल्यांतून उठवले. "जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो, त्याचा नाश होणार नाही, परंतु अनंतकाळचे जीवन मिळेल."

55 पुनरुत्थान तुमच्या स्वतःच्या जीवनात येऊ शकते. जर तुम्हाला ते मिळाले नसेल, तर आज सकाळी तुम्ही तुमचे हात त्याच्या कडे वर कराल का जेव्हा तुम्ही आपली मस्तके झुकवली आहेत, असे म्हणत, "देवा, माझी आठवण ठेव, की ते पुनरुत्थानरूपी जीवन, ते माझ्या हृदयामध्ये यावे." तुम्ही आपले हात वर करून म्हणाल का, "भाऊ ब्रॅन्हम माझ्यासाठी प्रार्थना करा, जेव्हा मी माझा हात वर करतो"? परमेश्वर तुम्हाला आशीर्वाद देवो. परमेश्वर तुम्हाला आशीर्वाद देवो. अजून कोणी आहे का जे आपले हात वर करून, म्हणतील, "भाऊ, माझ्यासाठी प्रार्थना करा, मला हे पुनरुत्थानरूपी जीवन स्वीकारायचे आहे"?

त्या तेजस्वी आणि ढगविरहित सकाळी…

तुम्ही याचा विचार करा जेव्हा आता आपण…?…

…ख्रिस्त उठेल,
आणि आपण त्याच्या पुनरुत्थानाच्या गौरवाचे वाटेकरी बनू;
जेव्हा निवडलेले लोक दुसऱ्या बाजूला जमतील,
जेव्हा तेथे नाव पुकारले जाईल, तेव्हा मी तिथे असेन.

जेव्हा तेथे नाव पुकारले जाईल,
जेव्हा तेथे नाव पुकारले जाईल,
आता जर तुम्हाला खात्री नसेल, तर आताच, करा.

…तेथे पुकारले,
जेव्हा तेथे नाव पुकारले जाईल, तेव्हा मी तिथे असेन.

आपण आपल्या स्वामी साठी श्रम करूया…(हे तुम्हा संतांसाठी आहे.)…सूर्य,
चला आपण बोलूया…

56 आता, तुम्ही जे ख्रिस्ती आहात, परमेश्वराला वचन देऊ इच्छिता, की अधिक श्रम करावे; खाली या, आपले हात वर करा.

आणि तेथे नाव पुकारले जाईल, मी तिथे असेन. (प्रभू तुम्हाला आशीर्वाद देवो.)

जेव्हा नाव…(जेव्हा तेथे नाव पुकारले जाईल, मी तिथे असेन,)
जेव्हा तेथे नाव पुकारले जाईल,
जेव्हा तेथे नाव पुकारले जाईल,
जेव्हा तेथे नाव पुकारले जाईल, मी तिथे असेन.

57 प्रिय देवा, तू येथील प्रत्येक हृदय पाहिले आहेस, आणि तुला त्यांचे हेतू आणि त्यांची उद्दिष्टे माहित आहेत. आणि मी दयेसाठी प्रार्थना करतो. देवा, ती प्रदान कर, या लोकांवर ती दया प्रकट केली जाईल. ते आज सकाळी, या समयाच्या आराधनेसाठी आले आहेत. ते ह्या ठिकाणी तुझे वचन ऐकण्यासाठी—साठी आले आहेत.

58 आणि जसे आपण बोललो आहोत, की जेव्हा तू जगलास, तेथे तुझ्यासारखे जीवन कधीच नव्हते. मरताना, तू एकटाच होतास जो अशा प्रकारे मरू शकला. जेव्हा तुला पुरण्यात आले, तू आमची पापे दूर नेलीस; लोकांची पापे स्वतःवर घेवून तू, तू त्यांना विस्मरणाच्या समुद्रात नेलेस. पण, उठण्याने, तू कायमचे विनामूल्य न्यायी ठरवलेस. आणि आज, आम्ही उभे राहून, तुझ्या येण्याची वाट पाहत आहोत.

59 देवा, त्यांना आशीर्वाद दे. आम्हाला मदत कर. आपल्याला जाणवते की आपल्याकडे अधिक वेळ नाही, कारण तो अगदी दाराशी आहे. आणि कोणत्याही...आणि शास्त्रज्ञांच्या मते, आतापासून एक तासात, राष्ट्रे नष्ट होतील. आणि आम्ही प्रार्थना करतो, देवा, या इस्टरच्या सकाळी, आम्ही त्याच्या आगमनाच्या जवळ उभे आहोत, जी मंडळीची आशा आहे. हजारो लोक पृथ्वीच्या मातीत पडून आहेत, ह्या तासाची वाट पाहत आहेत, त्यांचे आत्मे वेदीच्या खाली रडत आहेत, "किती काळ, प्रभु? किती काळ?" मी प्रार्थना करतो, देवा, की तू आमच्याशी बोलशील. आणि आपण हे लक्षात ठेवूया की आपण पृथ्वीवर काहीही केले तरी, ते फार थोडे आहे. आणि आता आपण फक्त एकच गोष्ट करू शकतो, ती म्हणजे तुझ्या येण्याची वाट पहावी, आणि सर्वांना सांगावे. संदेश तातडीचा आहे. आम्ही तो लोकांपर्यंत, लवकर पोहोचवावा, जेणेकरून तुम्ही कधीही यावे. ह्यापुर्वी ते ज्या बॉम्बबद्दल, आणि क्षेपणास्त्रांबद्दल बोलत आहेत, ज्यांचा हजारो पटीने वर्षाव एका मिनिटात पृथ्वीवर होऊ शकतो; ते होण्यापूर्वी, प्रभु, तू वचन दिले आहेस, की तु तुझ्या लोकांना नेण्या करीता येत आहेस. हे असेच होईल, प्रभु. त्यामुळे, कोणत्याही क्षणी, तेथे मंडळीसाठी पुनरुत्थान म्हणजे इस्टर होऊ शकते; या पापी जीवनातून पुनरुत्थान, ख्रिस्ताद्वारे अनंतकाळच्या जीवनापर्यंत. आमच्या प्रार्थना ऐक.

60 आणि आज, जसे आपण इतर सभांमध्ये, रविवारच्या स्कूलच्या शिकवणीकडे जातो, हे परमेश्वरा, पुन्हा बोल, आणि अनेक हृदयांना अद्भुतपणे सूचना दे. आणि आज सकाळी, या इस्टर सकाळी, ते डझनभर या तलावामध्ये येवोत, त्याचे बलिदान स्वीकारून, प्रभू येशूबरोबर दफन केले जावोत. ह्याने काहीही फरक पडत नाही की ते कोणत्या मंडळीचे आहेत किंवा कोणत्या धार्मिक पंथाचे आहेत, त्याने काही फरक पडत नाही. पण त्यांनी ते बलिदान स्वीकारले आहे का? ते कबूल करत आहेत की त्यांच्यात काही चांगले नाही, आणि हे की येशू एकटाच चांगला होता? आणि आमच्या जागी, तो आमच्यासाठी मेला. आणि त्याने आमची पापे घेतली आणि त्यांना पुरले, आणि आम्ही त्याच्यामध्ये एकटे उभे आहोत. आमच्या मंडळ्या आमच्या पापांना पुरू शकत नाहीत, आमचे स्वतःचे जीवन आमच्या पापांना दफन करू शकत नाही, परंतु ख्रिस्ताने विस्मरणाच्या समुद्रात आपली पापे पुरली. देवा, आता या गोष्टी तुझ्या दृष्टीने गौरवशाली होतील अशी अनुमती दे.

61 मग आज रात्री, प्रभु, तू तुझ्या पुनरुत्थानाच्या सामर्थ्याने ये, आणि या छोट्याशा जागेला असे हलव जसे की ती कधीही हलवली गेली नाही. चिन्हे आणि चमत्कार होऊ दे. प्रभु, असे पुन्हा एकवार होऊ दे, जसे की काही रविवारी पूर्वी झाले होते, जेव्हा आजारी आणि पीडित लोक आश्चर्यकारकपणे बरे झाले होते. प्रभु, आम्ही प्रार्थना करतो की आज रात्री, तुझ्या गौरवासाठी ते पुन्हा घडू दे.

62 प्रभु, आता आमच्या अपराधांबद्दल आम्हाला क्षमा कर, आणि हा, आपल्यापैकी काहींसाठी एक वास्तविक इस्टर होऊ दे, आपल्या सर्वांसाठी एक वास्तविक इस्टर असू दे. आणि आपल्यातील काही ज्यांनी इस्टरचे आशीर्वाद काय होते हे कधीच जाणले नाही, आज ख्रिस्त त्यांच्या अंतःकरणात, एक नवीन आशेसह, एक नवीन जीवनासह उदयास येवो. त्यांना कलवरीकडे निर्देशित करा. कारण आम्ही ते, येशूच्या नावाने मागतो. आमेन.

63 [टेपवरील रिक्त स्थान—एड.]...सहभागीतेचा हा समय मिळण्यासाठी. तुमच्यापैकी किती जण परमेश्वरावर प्रेम करतात? फक्त आपले हात वर करा. माझ्या देवा, हे आश्चर्यकारक आहे!

64 बंधू मॅकडॉवेल, मी ऐकले आहे की, तुम्हाला एक बाळ आहे ज्याचे तुम्हाला समर्पण करायचे आहे. तुम्ही संडे स्कूलच्या सभेसाठी परत येऊ शकता का? ठीक आहे, ते ठीक होईल. तेव्हाच आपण बाळांना समर्पण करू इत्यादि, त्या वेळी, जर तुमची हरकत नसेल, तर ते ठीक आहे.

65 आणि म्हणून आता, आम्ही सभेला काही क्षणांसाठी विसर्जित करणार आहोत, जेणेकरून तुम्ही तुमच्या ठिकाणी जाऊन तुमचा नाश्ता करू शकता, नंतर पुन्हा परत येऊ शकता. तुम्ही इथे आलात याचा आम्हाला आनंद आहे.

66 आणि आता, फक्त उभे राहूया. आणि तेच गाणे जे काही क्षणांपूर्वी आमच्याकडे होते, "त्या तेजस्वी आणि ढगविरहित..." किती जणांमध्ये ही आशा आहे? आपण पाहूया तुम्ही आपले हात वर करा. उभे रहा.

...ते तेजस्वी आणि ढगविरहित...

आता ते गा.

...जेव्हा ख्रिस्तामध्ये मेलेले उठतील,
आणि ते त्याच्या पुनरुत्थानाच्या गौरवयाचे वाटेकरी होतील;
जेव्हा पृथ्वीचे तारण पावलेले लोक दुसऱ्या बाजूला जमतील,
आणि जेव्हा तेथे माझे नाव पुकारले जाईल, मी तिथे असेन.

जेव्हा तेथे माझे नाव पुकारले जाईल,
जेव्हा तेथे माझे नाव पुकारले जाईल,
जेव्हा तेथे माझे नाव पुकारले जाईल,
जेव्हा तेथे माझे नाव पुकारले जाईल, तेव्हा मी तिथे असेन.

67 आता, आपण पुढील कडवे गात असताना:

पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत, आपण स्वामीसाठी श्रम करूया,
चला, (जगातील गोष्टींसाठी नव्हे तर) त्याच्या सर्व चमत्कारांबद्दल, प्रेमाबद्दल आणि काळजीबद्दल बोलूया.

आपण हे करत असता, तुमच्या मागे, तुमच्या समोर, तुमच्या बाजूला असलेल्या कोणाशी तरी हस्तांदोलन करा. आता सर्वांनी ते करूया. म्हणा, "सुप्रभात, ख्रिस्ती मित्रा, तुझ्यासोबत चर्चमध्ये आल्याने मला आनंद झाला." ठीक आहे.

चला आपण स्वामीसाठी श्रम करू या...
...त्याच्या सर्व आश्चर्यकारक प्रेम आणि काळजीबद्दल;
मग जेव्हा सर्व जीवन समाप्त होईल, आणि पृथ्वीवरील आपले कार्य पूर्ण होईल,
आणि तेथे माझे नाव पुकारले जाईल, मी तिथे असेन.

जेव्हा तेथे माझे नाव पुकारले जाईल,
जेव्हा माझे नाव...
...तिकडे,
जेव्हा तेथे माझे नाव पुकारले जाईल, तेव्हा मी तिथे असेन.

का? आपण तिथे कसे असू? कारण:

जगण्याने, त्याने माझ्यावर प्रेम केले; मरण्याने त्याने मला तारण दिले;
गाडले गेल्याने, त्याने माझी पापे दूर नेली;
उठण्याने, त्याने विनामूल्य कायमचे न्यायी ठरवले:
एके दिवशी तो येत आहे—होय, गौरवयुक्त दिवस.

जेव्हा तेथे माझे नाव पुकारले जाईल, तेव्हा मी तिथे असेन. (आपल्याकडे पावती आहे.)

...नाव...तिकडे,
जेव्हा तेथे माझे नाव पुकारले जाईल,
जेव्हा तेथे माझे नाव पुकारले जाईल,
जेव्हा तेथे माझे नाव पुकारले जाईल, तेव्हा मी तिथे असेन.

आपल्या माना झुकवू या.

68 प्रभु, एका तेजस्वी आणि ढगविरहित सकाळ, जेव्हा आपण आकाशात तो महान मेघधनुष्य पाहतो (त्या कराराचे देवाचे चिन्ह, तो सार्वकालिक करार: त्याने त्याचे वचन पाळले आहे.), मग आपण येताना, पाहू, आणि थडग्याचे दगड मागे पडतील, आणि जे पृथ्वीच्या मातीत झोपलेले आहेत ते पहिल्या इस्टरचा गौरवाचे वाटेकरी होण्यासाठी उठतील त्याच्याबरोबर, ज्याने हे शक्य केले, आमचा प्रभु. प्रभु, त्याबद्दल तुला धन्यवाद. मी खूप आनंदी आहे, प्रभु, ती आशा माझ्या हृदयात आहे. कारण मी माझे खांदे वाकलेले पाहतो, प्रभु, आणि—आणि वय वाढू लागले आहे; आता, मी टेकडीच्या शिखरावर पहात आहे. प्रभु, मला खूप आनंद आहे की ती आशा माझ्या आत जळत आहे. एके दिवशी तू येशील. मला खूप आनंद आहे की आज येथे असे अनेक जण आहेत जे तोच अनुभव करीत आहेत.

69 प्रभु, मी आज, प्रार्थना करतो, की तू आम्हांला एक महान दिवस देशील, आम्हाला आमच्या सर्व अपराधांची क्षमा कर, कारण आम्ही आमचे अपराध कबूल करतो, आणि हे कबूल करतो की आम्ही अयोग्य आहोत. परंतु ख्रिस्ताचा मृत्यू, दफन, पुनरुत्थान, ह्यांनी आपल्याला सिद्ध केले आहे की त्याच्या आत्म्याद्वारे ते आपल्या अंतःकरणात उदय पावले आहे, आपल्याला त्याच्या पुनरुत्थानाचे भागीदार बनवले आहे, आणि आता आपल्या हृदयात आपल्या पुनरुत्थानाची उत्सुकता आहे. कारण पापाला, आपण मेलो आहोत, आणि आपण नवीन जीवनात प्रवेश केला आहे, आणि जगाच्या जुन्या गोष्टींमधून नवीन जीवनात उठलो आहोत. हा बयाणा आहे, डाउन पेमेंट, हे प्रभु, तो—तो आमच्या पुनरुत्थानाचा बयाणा आहे.

70 ते अनुभवण्यात आणि एकमेकांवर त्याचा आनंद घेताना आम्हाला खूप आनंद होतो. ह्या गोष्टी, आम्ही आमच्या हृदयाची मोठी संपत्ती म्हणून जपून ठेवतो, अशी गोष्ट जी पैशाने विकत घेता येत नाही, जगाला ते मिळू शकत नाही, कारण देवाने ते आम्हाला विनामूल्य दिले, जसे ख्रिस्त त्यासाठी विनामूल्य मरण पावला.

71 आता, आम्ही प्रार्थना करतो की आज सकाळी तु आमच्याबरोबर असशील. आता, आम्हाला काही क्षण विश्रांती घेण्यास, आणि परत येण्यास, सहाय्य कर. आम्हाला एक उत्तम पुढील सभा दे. कारण आम्ही ते, त्याच्या नावाने मागतो, ज्याने आम्हाला सामूहिक प्रार्थना करण्यास शिकवले:

आमच्या स्वर्गातील पित्या, तुझे नाव पवित्र मानले जावो.
तुझे राज्य येवो. जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही तुझ्या इच्छेप्रमाणे होवो.
आमची रोजची भाकर आज आम्हाला दे.
आणि जसे आम्ही आमच्याविरुद्ध अपराध करणाऱ्यांना क्षमा केली, तसे आम्हाला क्षमा कर.
आणि आम्हांला परीक्षेत आणू नकोस, तर आम्हाला वाईटापासून सोडव; कारण राज्य, आणि सामर्थ्य, आणि वैभव, सदैव तुझे आहे. आमेन.

72 प्रभु तुम्हाला आशीर्वाद देवो, आता, आम्ही तुम्हाला पुन्हा भेटू तोपर्यंत, सुमारे एक...साडेनऊ वाजता. तुम्ही एकमेकांशी हस्तांदोलन करता; आणि आम्ही तुम्हाला साडेनऊ वाजता भेटू.

***जगणे, मरणे, पुरणे, उठणे, पुन्हा येणे*** MAR59-0329s

(Living, Dying, Buried, Rising, Coming)

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, ईस्टर रविवारी सकाळी सनराईज येथे, मार्च 29, 1959, ब्रॅन्हम टॅबरन्याकल जेफर्सनविले, इंडियाना, यू.एस.ए., येथे प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेरेकॉर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हा मराठी अनुवाद व्हॉईस ऑफ गॉड रेकॉर्डिंगद्वारे छापला आणि वितरित करण्यात आला.

MARATHI

©2023 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## छपाईच्या हक्काची सूचना

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice Of God Recordings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.



VOICE OF GOD RECORDINGS

P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.

www.branham.org